18-19 (17)

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Issue-22, Vol-08 April to June 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

# || Index ||


1) ROLE OF WOMEN IN ECONOMIC ACTIVITIES AND WOMEN EMPOWERMENT....
Dr. Pushpanjali Arya—Dr. B.P. Uniyal, Kotdwara || 10

2) Exploration of Paòça-kanya in Indian Epics: Normative Models in the Society
Manoj Kumar Barman || 15

3) GITA MEHTA'S RAJ:An Analysis
Ajatshatru Manik Bhagat—Dr. Raheel K. Quraishi || 19

4) Dr APJ Abdul Kalam's Thoughts on Students as Reflected in his Writings
Rajnikant S. Dodiya, VV Nagar (India) || 22

5) USE OF ICT IN TEACHING AND SOCIOLOGY
DR. KHANDU SAMBHAJI KALE, Kolhapur || 24

6) CULTURE OF DARGAHS IN BARAK VELLEY FOR PROMOTING SOCIAL INTEGRATION
Kamal Uddin Mazarbhuiya, Guwahati || 28

7) The Origin of Indian Music
Vishal Vijay Korde, Akola (M.S.) || 30

8) AUGMENTING BUSINESS THROUGH SOCIAL NETWORKING SITES
Dr Manoj Pandey, Madhya Pradesh || 32

9) INTERNATIONAL STUDENT MOBILITY IN INDIA: HIGHER EDUCATION
Dr. Patil Bhagwan Shankar, Sangli, Maharashtra || 36

10) SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION : PROGRAM IN INDIA
Dr. Sou. Patil Parvati Bhagwan, Hupri, Dist-Kolhapur || 40

11) ROLE OF LEARNING IN NEW TECHNOLOGY BASED CLASSROOM
Dr. Pushpa, Panipat || 44

12) Mahatma Gandhi And Women Empowerment
Dr. Rajesh Chandra Paliwal, Roorkee (Haridwar) || 47


www.vidyawarta.com/02 | http://www.printingarea.blogspot.com

13) Impact of Orientation Programme in Environmental Education on B.Ed. Students....
Asha Yadav, Lucknow || 53

14) Electroluminescence in Cadmium sulfide /Polyvinyle Carbazole (CdS/PVK) ...
Shruti Patel, Jabalpur(M.P) || 57

15) A Practical Study of Development of the life values through Sanskrit tea...
Dr.Priti J. Chauhan, Vapi || 63

16) BIOLOGICAL ACTIVITIES OF SCHIFF BASES AND THEIR TRANSITION METAL
D. T. SAKHARE, Dist. Aurangabad. (M.S.) || 69

17) All-pervasive Nature of Mathematics-Students' Perception
Ms. Sunita Shah || 73

18) महाराष्ट्रातील लघु उद्योगाचा विकास
प्रा. डॉ. पी. डी. जाधव, उमरखेड || 77

19) कविता महाजन यांच्या 'भिन्न' कादंबरीचे भाषाविशेष-
प्रा.डॉ. दिलीप पुंडलिक पवार, नाशिक || 80

20) 'एड्स' संबंधी महाविद्यालयीन विद्यार्थीमधील समज—गैरसमज
प्रा. रमेश विष्णू मोरे, रिसोड जि. वाशिम (महाराष्ट्र) || 83

21) साहित्यिक बाबुराव बागूल यांचे वैचारिक साहित्य:एक दृष्टीक्षेप
प्रा. डॉ. बी. डी. पवार-प्रा. के. एम. लोखंडे, नाशिकरोड || 88

22) संगीताची मेजवाणी प्रभाती सूर एक संगीत संजिवनी
डॉ. प्रा.सुनील पारीसे, कुंभारी अकोला || 94

23) आदिवासी साहित्य : स्वरूप आणि वेगळेपण
प्रा.सुलतान पवार, नंदुरबार || 97

24) 'दौड' उपन्यास : भूमंडलीकरण के परिप्रेक्ष्य में
डॉ. विलास ना. कांबळे. शिरूर ताजबंद ता.अहमदपूर जि. लातूर || 102

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

25) उराँव जनजाति का जनी शिकार
प्रो.ए.आर.बैरागी, जशपुर (छ०ग०) || 105

26) वैश्विक चुनौतियों और पारिवारिक मूल्यवत्ता में सामंजस्य स्थापित करती डॉ.मधु संधु की स्त्री
डॉ. दीप्ति, अमृतसर, पंजाब। || 108

27) ओड़िआ नाटकों में आदिवासी जीवन
रूपधर गोमांगों, हैदराबाद || 111

28) 'घुसपैठिये' कहानी संग्रह में दलित अस्मिता
डॉ.शिवकुमार सी.एस.हडपद, मैसूर, कर्नाटक || 117

29) "साक्षात्कार शोध प्रविधि:समस्या और समाधान"
प्रा.डॉ. देविदास जाधव, ता. बिलोली जि. नांदेड || 127

30) 'रेहन पर रग्घू':जड़ों से उखड़ने की पीड़ा
डॉ. राकेश कुमार तिवारी–प्रीती पाण्डेय, रायपुर (छ.ग.) || 128

31) बालिका श्रमिकों की समस्याएं
डा० ज़किया रफत, बिजनौर || 133

32) प्रधानमंत्री जन–धन योजना–एक विश्लेषणात्मक अध्ययन
दीपक कुमार ठाकुर–डॉ. डी. के. सिघंल, उज्जैन (म.प्र.) || 137

33) "ए.बी.सी.डी." उपन्यास में अन्तर्द्वन्द्व की संघन झलक
प्रो. राजिन्द्र पाल सिंह जोश–सुधा महला || 141

34) उत्तराखण्ड औद्यानिकी में विपणन की समस्याएँ
डा० गगनप्रीत सिंह सैनी, खटीमा || 145

35) भारतीय समाज में धर्मशास्त्रों की देन
दीपिका शर्मा, जयपुर || 152

36) पीलीभीत में देवहा नदी के तटवर्ती क्षेत्र का सांस्कृतिक विकास एवं आवासीय विन्यास का प्रारूप
डॉ० दीपक सिंह, शाहजहाँपुर || 155

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

37) भारतीय लोकतंत्र के संरक्षक के रूप में राष्ट्रीय मानवाधिकार आयोग
पूजा सिंह, वाराणसी || 159

38) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग का एक विश्लेषणात्मक अध्ययन
प्रभात कुमार सिंह, इलाहाबाद || 163

39) सुर के रामकाव्य में शिल्प विधान
डॉ० सरला चौधरी, जयपुर || 167




www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
April To June 2018
Issue-22, Vol-08


19

# कविता महाजन यांच्या 'भिन्न' कादंबरीचे भाषाविशेष

प्रा.डॉ. दिलीप पुंडलिक पवार
मराठी विभागप्रमुख,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

**********

कविता महाजन यांची 'भिन्न' ही दुसरी कादंबरी होय. त्यातील आशय मांडणी व शैलीमुळे कादंबरी भिन्नच वाटते. एकीकडे एड्सग्रस्त व्यक्तींचे होणारे हाल परिचित करून देतानाच हा आजार कोणत्या स्तरातील कोणत्या व्यक्तीला झाला आहे, यावर त्याची तीव्रता कशी अवलंबून आहे याचे दाहक वास्तव चित्रित करते.

कविता महाजन यांची 'भिन्न' कादंबरी प्रमुख तीन स्त्री व्यक्तिरेखांना केंद्रस्थानी ठेवून, समाजातील विविध स्तरातल्या एड्सग्रस्तांच्या समस्या, स्वयंसेवी संस्थांमधील राजकारण आणि स्त्री-पुरुष या नातेसंबंधातील राजकारण या तीन प्रमुख स्तरांचे दर्शन घडवते.

कविता महाजन यांनी रचिता, प्रतीक्षा व लेनिना या प्रमुख तीन स्त्री व्यक्तिरेखांमधून स्त्रियांच्या माणूसपणाचा शोध घेतलेला आहे. याशिवाय ॲड. जे. डी., डॉ. अनुप, विठ्ठल, मोहक (प्रसाद) माँ, राहुल, पार्वती याशिवाय असंख्य अन्य पात्रे आहेत.

''वास्तव थेट अंगावर यावं अशा पद्धतीनं लेखिकेने 'भिन्न' या कादंबरीचे लेखन केले आहे. आयुष्य जगताना अनुभवायला लागणारे रोजचे ताण त्यांच्या लेखनावरून दिसतात.''[१]

'भिन्न' कादंबरीची रचना पात्राभिमुखी निवेदनात्मक आहे. अशा या कादंबरीतील अनुभवांचे निवेदन संमिश्र व गुंतागुंतीचे आहे.

कविता महाजन 'ब्र' कादंबरीप्रमाणे 'भिन्न' कादंबरीतून पुन्हा एकदा स्वयसेवी संस्था बद्दलचे विदारक सत्य वाचकांसमोर मांडतात. एच.आय.व्ही. आणि एड्सबद्दलचे अज्ञान कित्येक निरपराध्यांना संपवते व हे कटू सत्य कादंबरीमध्ये वाचताना वाचकांना अंतर्मुख करते. या कादंबरीचे भाषाशैली हे ठळक वेगळेपण आहे. त्या अंगाने सदर लेखात शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भाषाशैली हे विचारांच्या आदान प्रदानांचे माध्यम मानले जाते. सामाजिक व्यवहार केवळ भाषेमुळे शक्य होतात. त्यामुळे भाषा ही सामाजिक संस्था आहे, असे म्हटले जाते. भाषा ही व्यक्ती, काल, प्रदेश, जाती-जमातीनुसार बदलते. हे सर्व बदल भाषेचे अंगभूत बदल असतात. ते कधी अतिसूक्ष्म असतात तर कधी चटकन लक्षात येण्याजोगे असतात. त्यामुळे भाषा कधीच एकसारखी एक ठोक किंवा एकपदरी नसते. भाषेतून मानवी मन व्यक्त होत असते व सामाजिक, वैयक्तिक, आर्थिक संदर्भ मिळतात. अशा या भाषेमधूनच साहित्यकृतीची निर्मितीही होते. म्हणून कादंबरीच्या मूल्यमापनात भाषाशैलीचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

कादंबरीच्या भाषेचे निकष कोणते, हा विचार करीत असताना निश्चित निकष अथवा नियम सांगणे चुकीचे ठरेल. मात्र या संदर्भात वेगवेगळ्या अभ्यासकांनी आपली मतं सांगितली आहेत. डॉ. गोडबोले व बापट यांनी असे सांगितले आहे की, ''कादंबरीत व नाटकात संवादाची भाषा जितकी नेहमीच्या सरावातील व स्वाभाविक असेल तितकी चांगली सहजसुंदरता व स्वाभाविकता हे चांगल्या कादंबऱ्याच्या भाषाशैलीचे गुण मानण्यात येतात.'' साहित्यातील प्रत्येक कलाकृती ही अनन्यसाधारण असते. कारण प्रत्येक कलाकृतीमधून प्रकटणाऱ्या भावभावना निरनिराळ्या असतात. त्यामुळे ही भाषा सतत वाङ्मयीन कलाकृतीशी निगडीत असते. अर्थात या भाषाशैलीचे स्वरूप समजावून घेताना लेखकाचे व्यक्तिमत्त्व आपण समजावून घेतले पाहिजे. या शैलीचा उगम लेखकाच्या शैलीतच असतो. या दृष्टीने डॉ. वीणा देव यांचे मत जाणून घेणे महत्त्वाचे वाटते, त्यांच्या मते, ''कादंबरीकाराची भाषा अनेक घटकातून सिद्ध होत असते. त्याला स्वतःला जन्मगत असा जो भाषिक वारसा लाभतो. तो त्याची भाषा घडवण्यातील अनेक महत्त्वपूर्ण घटक असतो. त्याचबरोबर लहानपणापासून त्याच्या भोवतालच्या अनेक माणसांकडून त्याच्यावर झालेले संस्कार, त्याच्या काळातील भाषेचे रूप, त्याने वाचलेल्या साहित्याचा त्याच्या मनावर झालेला संस्कार आणि त्याने स्वतःचे व्यक्तिमत्त्व या सर्व घटकांच्या मिश्रणातून त्याची स्वतःची भाषा सिद्ध हो[illegible]
कविता महाजन यांची 'भिन्न' ही कादंबरी समक[illegible]

महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक स्वरूपाची कादंबरी ठरते, तिचे अस्तित्व खेडे, शहर, महानगर इत्यादी क्षेत्रातील जाणवते. या कादंबरीत अनेक प्रयोग केले आहेत. त्यात 'भाषा' या घटकाचा समावेश होतो. या कादंबरीचा घाट रूढ कादंबरी साहित्यप्रकारापेक्षा वेगळा आहे. वर्तमानपत्र अहवाल, भाषणं, काव्य, अभंग अशा विविधप्रकारे वार्तांकन सदृश्य वाटावे असे त्यांच्या कादंबरीचे स्वरूप आहे. मात्र ही कादंबरी 'अहवाल स्वरूप' असल्याचे मला मान्य नाही. कारण 'वर्तमानपत्र' अथवा 'अहवाल' याच्यात न आढळणारी दृश्यात्मकता, लालित्य, लयबद्धता, शब्दांचा निनाद त्यांच्या कादंबरीत सापडतो. म्हणून सीताराम सावंत म्हणतात त्याप्रमाणे, ''महाजन यांच्या कादंबऱ्यांची चिकित्सा करायची म्हटली तर समीक्षेची पारंपरिक चौकट थिटी पडेल. म्हणजे त्या चौकटीतून पाहिल्यास त्यांच्या कादंबऱ्यांना योग्य न्याय देता येणार नाही.''[४] लेखिकेने या कादंबरीत भाषेची, विशेषत्वाने त्यात स्त्रियांच्या भाषेची व त्या संकेताची मोडतोड केलेली दिसते. लेखिकेच्या भाषाशैलीचे विशेष 'काव्यात्मकता' व 'उपरोध' या अंगाने शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**काव्यात्मकता**

कविता महाजन यांच्या 'ब्र' या कादंबरी लेखनात चित्रकाराचे व्यक्तिमत्त्व विशेषत्वाने दिसून येते. तर 'भिन्न' या कादंबरी लेखनात कवयित्रीचे व्यक्तिमत्त्व दिसते. लेखिकेने या कादंबरीत ही काव्यात्मकता हेतूपूर्वक लादलेली नाही तर ती स्वयंभू स्वरूपाची आहे. त्यांच्या कादंबरी लेखनाचे हे वेगळेपण दिसून येते.

आशय आणि वातावरण यांच्या एकरूपतेमधून काव्यात्मकतेचे अनेक नमुने 'भिन्न' या कादंबरीत आढळून येतात. ही काव्यात्मकता कधी निवेदनाच्या ओघात तर कधी संवादामधूनही आढळते. पात्रांच्या मनातील भाव-भावनांचे सूचक आविष्कार तिच्यात दिसून येते. उदा. या कादंबरीतील : पृ. ८८ आणि ८९ वरील वर्णन अभ्यासण्याजोगे आहे.

रचिता, लेनिना व प्रतीक्षाच्या (निवेदिका पात्र) मनात उमटणाऱ्या भावभावनांची आंदोलने लेखिकेने सूचकपणे वर्णन केली आहेत. रचिताच्या संवाद, स्वगत आणि निवेदनाच्या ओघात आलेल्या काव्यात्मकतेमुळे लेखिका निवेदिकाला झळाळी प्राप्त करून देते.

''मला कळून चुकले... की, आता हा अनामिक आजाराचा नाग माझ्यात सतत वास्तव्य करून राहणार आहे. त्याचं अस्तित्व मला हलकं करून सोडणार आहे. माझ्या हालचालीचं सूत्र त्यानं स्वतःच्या हातात घेतलंय. माझ्या विचारांचा एकेक कप्पा तो बळकावत जाईल. माझ्या भावनांचा कल दुसऱ्या कुणाकडे जरादेखील झुकतोय याचा त्याला किंचित संशय आला तरी संपेल. त्याची नुसती साधी चाळवाचाळही सगळं शरीर हतबल करून टाकते, मग तो जर चवताळला तर माझं काय होईल?'' (भिन्न, पृ. २५)

हा रचिताच्या मनातील संवाद वाचकांना खिळवून ठेवतो.

कविता महाजन यांच्या निरीक्षणात व अवलोकनात घटकांचे जे अनेक बारकावे टिपले गेलेले आहेत त्यामुळे वाचकांना ते तल्लीन करतात. त्यामुळे ही उल्लेखनीय आहे.

''खरं तर हा नकार मला माहीत होता, तुम्हाला मी विचारलं तेव्हाच तरीही मी विचारलं

कदाचित

: तुमच्याकडून शिक्कामोर्तब करून घ्यावं आणि परिस्थितीची अनिश्चितता संपवावी म्हणून.

: प्रत्येकवेळी तुमच्याशी बोलताना लिहिलेली पत्रं तुमच्याकडे पाठवताना याचा तुम्हाला त्रास होईल, वैताग येईल...

याची धाकधुक टळावी म्हणून...'' (भिन्न, पृ. ९७)

(प्रतीक्षासंबंधी)

किंवा

''आपण मरतो म्हणजे काय होतं?<br>
आपण एक असतो ते पुन्हा अनेक होते.<br>
वेगळं बनते.<br>
कोळसा, राख, माती, अन्न अजून बरंच काही.<br>
कणाकणात मिसळतो, विरघळतो, रूपांतरित होतो, पुन्हा उगवतो.<br>
एकच एक असणं कंटाळवाणं होईल, असह्यही;<br>
म्हणून आपण बदलतो.'' (पृ. २१०) (रचितासंबंधी)

या एखाद्या काव्यात शोभतील अशा ओळी आहेत. या प्रत्येक ओळी ओळीत कितीतरी काव्यात्मकता ठासून भरलेली आहे. या ओळी केवळ काव्यात्म नाही तर, त्यात पुरेशी प्रतिकात्मकताही दडलेली आहे. वरील ओळीत लेखिकेने अनुक्रमे 'नकार' आणि 'मरण' या वर्ण्यविषय झालेल्या वस्तुस्थितीचं जीवन तसतशीत रूपात साकार केले आहे. प्रतिभावंत साहित्यिक विषय वस्तूशी जेव्हा तादाम्य पावतो. तेव्हा त्याच्या भाषेचे स्वरूप आपोआपच काव्यात्मक व कलात्मक बनलेले दिसून येते. कविता महाजन यांच्या अंगी

विषय वस्तूशी तादाम्य पावण्याची सूक्ष्म संवेदनशीलता प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या साहित्याच्या अभ्यासानंतर कोणत्याही अभ्यासकाला हे मान्य करावेच लागेल.

लेखिकेच्या 'भिन्न' कादंबरीतील ओघवत्या, उत्कट व काव्यमय भाषाशैलीचं हे विशेष आहे. एकंदरीतच 'भिन्न' कादंबरीच्या एकूण ४३२ पृष्ठांमध्ये असंख्य ठिकाणी ही काव्यात्मकता विखुरलेली आहे.

**उपरोधिका**

काव्यात्मकतेबरोबर 'उपरोधिकता' हा कविता महाजन यांच्या भाषाशैलीचा प्रमुख विशेष आहे. त्यांच्या 'तत्पुरुष' आणि 'धुळीचा आवाज' हे दोन काव्यसंग्रह तसेच 'ब्र' पाठोपाठ 'भिन्न' या कादंबरीत हा विशेष प्रामुख्याने दिसून येतो.

कविता महाजन यांची भाषा प्रसंगी जेवढी काव्यमय रूप धारण करते तेवढीच विशिष्टप्रसंगी सामाजिक, राजकीय, पारंपरिक व विसंगतीवर जोरदार हल्ला करतात. भाषेचे हे दुहेरी रूप त्यांच्या कादंबरीला यथायोग्य व पोषक ठरले आहे. त्यातून त्यांच्या लेखनाला अधिक कसदार व धारदार बनवण्यास साह्य ठरते. 'भिन्न'कादंबरीत ही उपरोधिकता असंख्य ठिकाणी प्रत्ययास येते. रचिता ही या कादंबरीतील निवेदक स्त्री पात्र आहे. ती एका महिलांच्या जिममध्ये 'जिम इन्स्ट्रक्टर' म्हणून काम करते. रचिताच्या व्यक्तिरेखाटनमार्फत लेखिका समकालीन उच्चभ्रूवर्गातील स्त्रियांची उपरोधिकपणे दखल घेतात.

''हा शेफाली मॅडमच्या बायकांचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित करून देणारा क्लब. मुळातच त्या डॉक्टर म्हणजे ॲक्टिंग जमतं असं नाही काही. पण व्यवसायानं ॲक्टर दिसायला एकदम खव्याचा गोळा. मग नाही उमटली चेहऱ्यावर एक्सप्रेशन्स तरी चालतात.'' (पृ. १६)

''बोलायचं कसं, हसायचं कसं, नाचायचं कसं, जेवायचं कसं, प्यायचं कसं... असे सगळे शिष्टाचार, मग टेबल मांडण्याच्या पद्धती, घर सुबक ठेवण्याच्या पद्धती, फुलं रचण्याच्या पद्धती हे सगळं... बाह्य व्यक्तिमत्त्व खुलवणाऱ्या गोष्टी, मग शरीराचा सांभाळ, आरोग्य डाएट व्यायाम मेकअप, सेक्स, इत्यादी...'' (पृ. १६)

यातून त्या आपल्या उपरोधिक शैलीने उच्चभ्रूवर्गातील स्त्रियांचे 'असण्यापेक्षा दिसण्याला' जे आज महत्त्व आले त्याचा परामर्श घेतात. बऱ्याच वेळा हा उपरोधिकपणा अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतो व त्यामुळे त्यांच्या या कादंबरीतील नायिका या बंडखोर वाटतात. रचिताच्या निवेदनामधून पांढरपेशीय उच्च मध्यमवर्गीय स्त्रियांचं वागणं स्पष्ट करताना. ''रात्री झोपायच्या आधी आंघोळ करायची. आंघोळीच्या पाण्यात आरोमाचे अमुक सुगंधाचे थेंब टाकायचे. सिझन कोणता आहे, नवऱ्याचा मूड कसा आहे इत्यादी गोष्टींचा अंदाज घेऊन ब्रा-पॅन्टीचे रंग ठरवायचे. नाईट गाऊन सिल्कचा की, टू पीस की कुर्ता-पायजामा की लुंगी हे ठरवायचं इथपासून सगळ्या टिप्स सुरू होतात.'' (पृ. १९) अशाप्रकारे स्त्रियांवरच्या अन्यायाबरोबरच स्त्रियांचे नाहक छंद-फंद व त्यापायी होणाऱ्या खर्चाऊ प्रवृत्तीवर लेखिका टीका करतात.

समकालीन समाजातील दोषपूर्ण विसंगती व घटना-प्रसंग कविता महाजन यांच्या निवेदनाचा विषय बनतो. त्यावेळी लेखिका दोषपूर्ण विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवतात.

''आलेल्या प्रेसवाल्यांत एक रंगीत पत्रकार होती. म्हणजे तिच्या पर्समध्ये पेनापेक्षा लिपिस्टीकची संख्या जास्त होती. पेज थ्रीच्या पार्ट्या सोडून का तिला इथं पाठवलं गेलं होतं देव जाणे. तिनं मुर्ख पोरकट प्रश्न विचारून सगळ्यांना वात आणला.'' (पृ. २७४)

''एक किडकिडीत वयस्कर पत्रकार होते... काका कॅटीगरीतले. त्यांनी तर भाषणच ठोकलं, म्हणाले 'लग्नापूर्वी जय हनुमान व लग्नानंतर जय श्रीराम या गुणाचं आचरण केल्यास, एड्सचा धोका नाही.''

लेनिना मागून हळूच म्हणाली ''पण बायको सीता नसेल तर काय करणार?'' (पृ. २७८)

अशा या घटना-प्रसंगामधून लेखिका समकालीन पत्रकार व प्रसिद्धी माध्यमांची स्थिती, तसेच गंभीर विषयासंदर्भातही पत्रकार व संपादक यांचे होत असलेले दुर्लक्ष. उपरोधिक शैलीत मांडतात. लोकशाही शासन प्रणालित लोक प्रसिद्धी माध्यमांकडे एक जबाबदार घटक म्हणून पाहतात. मात्र प्रसिद्धी माध्यम नको त्या गोष्टीकडे वळाल्यानं समाजात एड्ससारख्या दुर्धर आजाराबाबत जनतेत जागरूकता निर्माण होण्यासाठी, या आजाराविषयीचे अज्ञान दूर करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत, त्यामुळे समकालीन समाजातील या सोंग-ढोंगावर प्रहार करताना लेखिकेची लेखणी प्रसंगी आक्रमक बनते व ती समाजातील सर्वसामान्यांच्या हिताची वाटते. त्यामुळे वाचकांना लेखिका अधिक जवळच्या वाटतात. समकालीन समाज, स्वयंसेवी संघटनामधील राजकारण, स्त्री-पुरुष संबंधातील राजकारण, मानवी नात्यामधील राजकारण यावर त्या मार्मिक प्रहार करतात.

समकालीन राजकीय नेते, त्यांची आवड-निवड, तसेच त्यांच्या नातेवाईक कुटुंबाच्या नावावर स्वयंसेवी संघटनाची नोंदणी करून, त्यात केलेला भ्रष्टाचार आदींबाबत लेखिकेची लेखणी जागृती ठक्करसारख्या संस्था चालक स्त्रीचे कडवट स्वरूपात दर्शन घडवते.

**निष्कर्ष**

१. कविता महाजन यांची 'भिन्न' ही कादंबरी 'भाषाशैली'मुळे वेगळेपण सिद्ध करते.

२. कविता महाजन यांनी भाषेची व विशेषतः स्त्रियांच्या भाषेची मोडतोड केली आहे त्यामुळे या कादंबरीला वेगळेपण प्राप्त झाले आहे.

३. 'उपरोधिकता' व काव्यात्मकता हे भिन्न कादंबरीचे ठळक भाषिक विशेष आहे.

४. भिन्न कादंबरीत आलेली भाषिक काव्यात्मकता ही लेखिकेच्या विषय वस्तूशी तादात्म्यता यामुळे कादंबरीत दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. आसावरी काकडे, 'केशवराव कोठावळे पारितोषिक २००८', ललित, वर्ष ४५, अंक ६, जून २००८, पृ. ५७

२. वा. ना. गोडबोले व नापट, 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती १९७३, पृ. १२९

३. वीणा देव, 'कलांतर : रूप, स्वरूप व समस्या', मराठी कथा-कादंबरीला दिलेल्या नाट्यरूपाच्या संदर्भात (पुणे विद्यापीठ, पुणे. पीएच.डी प्रबंध) मार्गदर्शक : डॉ. भालचंद्र फडके, मे १९९७, पृ. ३७

४. सीताराम सावंत, 'आभाळ फाटल्या जगाचे थेट शब्दांकन भिन्न', परिवर्तनाचा वाटसरू, वर्ष ७, अंक २०, पुणे (१६ ते २९ फ्रेबुवारी २००८) पृ. १४

**आधारभूत ग्रंथ**

महाजन कविता, 'भिन्न', राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २००७

❑❑❑

**20**

# 'एड्स' संबंधी महाविद्यालयीन विद्यार्थीमधील समज–गैरसमज

प्रा. रमेश विष्णू मोरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,
रिसोड जि. वाशिम (महाराष्ट्र)

**********

**सार**

भारतीय आरोग्य संघटनेनेही असे भाकित केले आहे की पुढील दशकात अशी परिस्थिती येईल की, भारतात दररोज १०,००० लोक निव्वळ एड्सने बळी पडतील. एकूण तीन कोटी रूग्ण फक्त भारतातच असतील. एड्स हा एक गंभीर असा रोग असून यामध्ये शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती हळूहळू कमी होते. प्रस्तुत संशोधन लेख तयार करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन पश्चिम विदर्भाची निवड करण्यात आली आहे. सादरील लेखात महाविद्यालयीन विद्यार्थी मध्ये एड्स बाबत असलेल्या गैरसमजचा अभ्यास करण्यात आला आहे.

**कळ शब्द–** एड्स, एच.आय.वी

**प्रस्तावना**

जागतिक आरोग्य संघटनेच्या सप्टेंबर १९९९ च्या निष्कर्षानुसार भारत व त्याच्या नजिकच्या प्रदेशात साधारण ब्याण्णव हजार एड्स चे रूग्ण ज्ञात आहेत. या ताज्या अहवालात पुढे असेही नमूद केले आहे, की एड्सच्या एकूण लागण झालेल्या रूग्णांपैकी फक्त पंचविस टक्के रूग्णच नोंदले गेले आहेत. पंचाहत्तर टक्के रूग्ण अजुनही छुपेच आहे. नेमके निदान न होणे, झाल्यावर ते गुप्त ठेवण्याकडे लोकांचा असलेला कल व त्यानंतर नोंद करताना होणारा विलंब इत्यादी कारणांनी दिशाभूल करणाऱ्या आकडेवारीचा गंभीर प्रश्न निर्माण होतो.